


**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय वविशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (प) मुबई- ४०० ०८८

रजि नं :४३७६०३ EMAIL ID: esta.arti@gmail.com website: https://arti.org.in फोन नं: ०२२- २५००१९४/२५५००१९५/४४५१५८५४


जा.क्र/आर्टी/योजना/का.प.सू/२०२५-२६/००५३ दिनांक – ०५/०२/२०२६

## उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना

❖ **उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीबाबत महत्वाच्या सूचना**

१. दि. ११/०२/२०२६ पासून उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी ही पसंतीक्रम दिलेल्या प्रशिक्षण संस्थाद्वारे करण्यात येणार आहे. उमेदवारांनी संबंधित प्रशिक्षण संस्थांशी संपर्क करून कागदपत्रे पडताळणी ही लवकरात लवकर पूर्ण करावी.

२. खालील नमुद कागदपत्रे उमेदवारांनी २ छायांकित प्रती मध्ये पडताळणीसाठी सोबत आणणे आवश्यक आहे. खाली नमुद केलेले सर्व प्रमाणपत्रे उपलब्ध करून देणे उमेदवारांस बंधनकारक आहे.

   a. Caste Certificate जातीचा दाखला
   b. Caste Validity Certificate (if Available) जात वैधता प्रमाणपत्र
   c. Domicile Certificate रहिवास दाखला
   d. Income Certificate उत्पन्न दाखला (Year – २०२५ -२६)
   e. Aadhar Card आधार कार्ड
   f. Bank Passbook बँक पासबुक
   g. CET – Score Card
   h. Training Institute Preference Acknowledgment Receipt.
   i. २ Passport Size Photocopy
   j. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
   k. दुबार योजनेचा लाभ न घेतलेले प्रतिज्ञापत्र (नमुना खाली जोडलेला आहे)

३. शैक्षणिक अर्हता योजनांच्या पातळीनुसार आहे. त्याची यादी खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे उपलब्ध करून द्यावीत. तसेच परिक्षेच्या वेळी दिलेल्या शैक्षणिक अर्हता पडताळणी करून पहाव्यात व त्यानुसार पूर्तता करावी.

| अ.क्र | योजनेचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | मिलीटरी भरती प्रशिक्षण | १० वी पास |
| २. | पोलीस भरती प्रशिक्षण | १२ वी पास |
| ३. | आयबीपीएस, बँक.व इतर स्पर्धा प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ४. | कर्मचारी निवड आयोग – वर्ग ३ परिक्षा प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ५. | एम.पी.एस.सी.- अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ६. | एम.पी.एस.सी.- राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ७. | एम.पी.एस.सी.- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | संबंधित क्षेत्रातील पदवी उत्तीर्ण |
| ८. | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) प्रशिक्षण | संबंधित क्षेत्रातील पदवी उत्तीर्ण |
| ९. | यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |

४. सर्व मुळ प्रमाणपत्रे तपासून संस्थांनी उमेदवारांकडून त्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती २ प्रतीत जमा करून घेणे गरजेचे आहे. सदर जमा करून घेतलेले सर्व कागदपत्रे आर्टी, मुंबई कार्यालयास पडताळणी पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रांची १ प्रत कार्यालयास पाठवून द्यावीत.

५. उमेदवारांनी पडताळणीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सोबत आणावीत तसेच सर्व प्रमाणपत्रांच्या ०२ छायांकित प्रती संस्था चालकांना उपलब्ध करून द्याव्यात.

स्वाक्षरी/-

व्यवस्थापकीय संचालक

**अण्णा भाऊ साठे संशोधन व**

**प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**